**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर — असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**शैक्षणिक**

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/ 12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ०४ था | गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# असमानीनंतर सुलतानी संकट ! बोगस बियाण्यांवर हजारो तक्रारी

## १०० एकरावरील सोयाबीन उगवलेच नाही !

## सोलापूर जिल्ह्यातील १२ शेतकऱ्यांच्या 'कृषी'कडे तक्रारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे मुख्य खरीप पीक असलेल्या सोयाबीनवर यंदा अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटे आली असून, शेतकऱ्यांकडून उगवण क्षमतेच्या शेकडो तक्रारी येऊ लागल्या आहेत.

आतापर्यंत कृषी विभागाकडे तीन हजार ६१५ तक्रारी आल्या असून, प्रयोगशाळांकडे पाठवलेले ५८१ नमुने अप्रमाणित निघाले आहेत. यामुळे ' क्शन मोड'वर आलेल्या कृषी विभागाने आतापर्यंत बियाणे कंपन्यांवर चार ठिकाणी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

राज्यात यंदा ४७ लाख हेक्टरहून अधिक सोयाबीनचा पेरा होण्याची अंदाज आहे. त्यापैकी १३ जुलैअखेर ३७ लाख ३६ हजार हेक्टरवर पेरा झाला आहे. कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सोयाबीन उत्पादक शेतकरी एकूण बियाण्यांपैकी ७५ टक्के घरगुती बियाणे वापरतात. तसेच २० ते २५ टक्के बियाणे बाजारपेठांमधून घेऊन वापरले जाते. राज्यात बियाण्यांची विक्री करणाऱ्या ५० पेक्षा जास्त कंपन्या आहेत. या कंपन्यांकडून शेतकऱ्यांना सत्यप्रत बियाण्यांची विक्री केली जाते.

प्रमाणित बियाण्यांप्रमाणे सत्यप्रत बियाणे शासनाच्या काटेकोर तपासणी प्रणालीत समाविष्ट नाही. खासगी कंपनी स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीन बियाण्याच्या विक्री पिशवीवर 'किमान ७० टक्के उगवण क्षमता असलेले सत्यप्रत्य बियाणे' असे लेबल लावते. खासगी कंपन्यांच्या या लेबलच्या भरवश्यावर शेतकरी बियाणे विकत घेऊन पेरा करतो.

सोलापूर जिल्ह्यात जून महिन्यात ३५ हजार हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे. मॉन्सूनच्या सुरवातीला बार्शी तालुक्यात थोडा पाऊस झाला होता, त्यावेळी शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरले.

मात्र, १२ शेतकऱ्यांचे सुमारे १०० एकरावरील सोयाबीन उगवलेच नाही. त्यांनी आता कृषी विभागाकडे धाव घेतली असून त्याचे पंचनामे सुरू आहेत.

सोलापूर जिल्ह्यात जुलैपर्यंत १९८ मिलिमीटर सरासरी पाऊस अपेक्षित आहे, पण सध्या सरासरीच्या ५० टक्केसुद्धा पाऊस झाला नाही. मात्र, जूनमध्ये सुरवातीच्या काही नक्षत्रात पाऊस होईल, या आशेने शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीद, मका अशा पिकांची पेरणी केली. जिल्ह्यात पाऊस झालेला नसल्याने त्या पिकांनी आता माना टाकल्या आहेत. त्यातच सोयाबीनचे बियाणे बनावट निघाल्याच्या तक्रारी बार्शीतील शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे केल्या आहेत. त्या १२ शेतकऱ्यांनी आम्ही पेरलेले बियाणे उगवलेच नाही, असे म्हटले आहे.

तक्रार निवारण समितीत 'महाबीज'चा प्रतिनिधी, पंचायत समितीची कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, कंपनीचा प्रतिनिधी, राहुरी कृषी विद्यापीठ किंवा कृषी विज्ञान केंद्राचे अधिकारी असतात. समितीच्या पंचनाम्यातून जमिनीतील ओलावा कमी असल्याने की बियाणेच बनावट होते, ही बाब समोर येणार आहे.

**१८.५८ लाख क्विंटल खासगी बियाणे बाजारात**

राज्यात 'महाबीज'सह विविध खासगी कंपन्यांनी १८ लाख ५७ लाख क्विंटल सोयाबीन बियाणे यंदा राज्याच्या बाजारपेठांमध्ये विक्रीला आणले आहे. यापैकी आतापर्यंत किती विकले गेले, यातील नेमके निकृष्ट बियाणे किती याची माहिती नसल्याने कृषी विभागदेखील संभ्रमात आहे. त्यामुळे तक्रारी असलेल्या जिल्ह्यांवर कृषी विभागाच्या गुणनियंत्रण निरीक्षकांनी लक्ष केंद्रित केले आहे.

सदोष बियाण्यामुळे उगवण न झाल्याच्या आतापर्यंत साडेतीन हजाराहून अधिक तक्रारी शेतकऱ्यांकडून आल्या आहेत. यात मुख्यत्वे अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. यातही पुन्हा सर्वाधिक तक्रारी बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या विरोधात दाखल झाल्या आहेत.




**पंचनामा अहवालानंतर पुढील कार्यवाही :**

> “ सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील १२ शेतकऱ्यांनी त्यांनी पेरलेले सोयाबीन उगवले नाही, अशा तक्रारी केल्या आहेत. आता तक्रार निवारणी समितीच्या माध्यमातून त्याचे पंचनामे सुरू आहेत. त्या अहवालानंतर शेतकऱ्यांना ग्राहक मंचाकडे तक्रारी कराव्या लागतील. - **शुक्राचार्य भोसले,** कृषी अधीक्षक, सोलापूर

या कंपनीविरोधात १३ जुलैअखेर ११२९ तक्रारी आल्या असून, कृषी विभागाने अकोला व अमरावती व वर्धा अशा तीन जिल्ह्यांमध्ये कंपनीविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर रवी हायब्रीड सीड्स अॅण्ड रिसर्च कंपनीविरोधात ८७० तक्रारी शेतकऱ्यांकडून आल्या आहेत. या कंपनीविरोधात देखील अकोला जिल्ह्यात फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. 'महाबीज', तसेच पार्श्व जेनेटिक्स कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांविरोधात तक्रारी येत असून क्षेत्रीय पातळीवर तपासणी सुरू करण्यात आली आहे.

**१५ दिवसांनंतर दुबार पेरणीचे संकट**

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यात सर्वात कमी १० टक्केच क्षेत्रावर पेरणी झाली आहे. याशिवाय अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा, मोहोळ, माढा, सांगोला, पंढरपूर या तालुक्यात २० टक्क्यांपेक्षा कमी क्षेत्रावर पेरणी झाली आहे. बार्शीत सर्वाधिक ५० टक्के, करमाळा व माळशिरस तालुक्यात सरासरी ४० टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात तीन लाख ३७ हजार हेक्टरवर खरिपाची पेरणी होते, पण यावर्षी १४ जुलैपर्यंत ९७ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. मात्र, पाऊस नसल्याने पेरलेल्या पिकांनी माना टाकल्या असून पुढील १५ दिवसांत पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट ओढावू शकते, अशी भीती कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात स्वागत व निरोप समारंभ उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांची प्रशासकीय बदली छत्रपती संभाजीनगर येथे तर त्यांच्या जागी प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी म्हणून प्रमोद पाटील आणि लिपिक प्रदीप गाडे यांची पुणे येथे झाल्याने त्यांच्या जागी हिरालाल पाटील यांनी पदभार घेतल्याने या सर्वांच्या गौरवार्थ सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे, जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवक यांच्या उपस्थितीत स्वागत व निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



मंगळवारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालय चळवळीचे नेते तथा ग्रंथमित्र कुंडलिक मोरे होते. विचारपीठावर निरीक्षक संजय ढेरे, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, कार्यवाहक साहेबराव शिंदे उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना कुंडलिक मोरे म्हणाले की, ग्रंथालय चळवळ जर सक्षम करावयाची असेल तर ग्रंथालय अधिकार्यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. १९९० पासून ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी ग्रंथालय चालक व ग्रंथालय अधिकारी यांचा कसा समन्वय साधला याबाबत उहापोह करून ग्रंथालयांचे अनुदानाचा विषय मार्गी लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे ही मोरे यांनी शेवटी सांगितले.

याप्रसंगी बोलताना सुनिल हुसे यांनी सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालकांना व चळवळीतील प्रत्येकाला मी कोठेही असलो तरी सवोतीपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना प्रमोद पाटील यांनी वरीष्ठ अधिकारी, कार्यालयीन सहकारी व ग्रंथालय चालक व चळवळीतील प्रत्येकाच्या सहकार्याने जिल्ह्यात खूप मोठे भरीव कामगिरी करून दाखविणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सुनील हुसे आणि प्रदीप गाडे यांनी सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीच्या बळकटीसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या कार्यकाळात शासनमान्य ग्रंथालयांशी समन्वय, विविध प्रशासकीय कामकाजाची परिणामकारक अंमलबजावणी आणि ग्रंथालय सेवेच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले. त्यांच्या पुढील सेवाप्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच नवनियुक्त प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रमोद पाटील आणि हिरालाल पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. जिल्ह्यातील ग्रंथालय विकास, वाचन संस्कृतीचा प्रसार आणि शासनमान्य ग्रंथालयांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी ग्रंथ मित्र जयंत आराध्ये, प्रकाश शिंदे, धोंडीबा बंडगर, सारिका माडीकर, वृषाली हजारे, दत्ता मोरे, जोतिराम चांगभले, बेडगणूर सर, परबत, महेश कुलकर्णी,दत्ता मोरे, जोतिराम चांगभले, बेडगणूर सर, परबत, महेश कुलकर्णी यांच्यासह ग्रंथालय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल, कर्मचारी, सेवक तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पंढरपुरात 217 आस्थापनांची तपासणी, 3 हॉटेल्स बंद

### आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित व दजेर्दार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने 14 जुलै 2026 पर्यंत शहरात धडक तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेत 217 आस्थापनांची तपासणी करून 172 नमुने घेतले असून 3 आस्थापनांना तात्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.









अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी, प्रसाद विक्रेते अशा 217 आस्थापनांची अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान विविध खाद्यपदार्थांचे 172 नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

**तीन आस्थापनांवर कारवाई**

निकृष्ट दर्जा व स्वच्छतेच्या अभावामुळे खालील ३ आस्थापनांना तात्काळ व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले :

1. मे. मंगलमुर्ती मिसळ व भेळ, तीन रस्ता, शेगांव दुमाला, ता. पंढरपूर
2. मे. हॉटेल स्वरा अॅण्ड चायनिज सेंटर, शेगांव दुमाला, ता. पंढरपूर
3. मे. हॉटेल श्री विष्णू सहस्त्रनाम, शेगांव दुमाला, ता. पंढरपूर

**वारी काळात विशेष दक्षता**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात देशभरातून लाखो वारकरी दाखल होत असतात. भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे किंवा उघड्यावरील अन्नपदार्थांमुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. अन्नपदार्थ साठवणूक, स्वच्छता, वापरले जाणारे तेल, रंग व इतर घटकांची गुणवत्ता याबाबत काटेकोर तपासणी करण्यात आली.

सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी सांगितले की, नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित आस्थापनांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. सर्व व्यावसायिकांनी स्वच्छता, गुणवत्ता व नियमांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

आषाढीवारीसाठी प्रशासनाचे 20 पथके कार्यरत आहेत. वारी कालावधीत अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक 1800222365 वर संपर्क साधावा, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## मंत्रालयापासून शाळा-कॉलेजपर्यंत सर्वत्र होणार अजितदादांची जयंती



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या तडाखेबंद कार्यपद्धतीसाठी आणि प्रशासनावरील जरबेसाठी ओळखले जाणारे 'दादा' म्हणजेच राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाला आता थेट ऐतिहासिक आणि शासकीय मान्यता मिळाली आहे.

सन २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत शासकीय जयंती कार्यक्रमांच्या यादीत आता स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने आज, १५ जुलै २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

**'ती' मागणी लागली मार्गी!**

काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना एक लेखी निवेदन दिले होते. अजितदादांचे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि पायाभूत विकासातील योगदान अद्वितीय आहे. त्यामुळे त्यांचा जन्मदिवस (२२ जुलै) हा शासकीय जयंती कार्यक्रमांच्या सूचीमध्ये समाविष्ट करावा, अशी आग्रही मागणी या दोन्ही ज्येष्ठ मंत्र्यांनी केली होती.

(पान 2 वर..)

## पंढरपूर कॉरिडॉर बाधित आक्रमक

### मुख्यमंत्र्यांना दाखवणार काळे झेंडे; दुकानं बंद ठेवून करणार निषेध

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर कॉरिडॉर करताना बाधितांना विश्वासात घेऊनच कॉरिडॉर करू असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. मात्र बाधितांना विश्वासात न घेताच कॉरिडॉर करण्याचे नियोजन केले आहे.



मुख्यमंत्र्यांनी आमचा विश्वासघात केल्याची भावना बाधित कुटुंबामध्ये निर्माण झाली असून 24 आणि 25 जुलै रोजी आपली दुकाने बंद ठेवून निषेध करण्याचा निर्धार करताना शासकीय महापूजेला येणाऱ्या मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून स्वागत करणार असल्याचे बाधितांचे नेते बाबाराव महाजन बडवे यांनी जाहीर केले.

श्री विठ्ठल मंदिराजवळ बाधित कुटुंबाची आज बैठक पार पडली. या बैठकीला बाधित व्यापारी व बाधित कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉरिडॉर आराखडा करताना विश्वासात घेण्याचा शब्द दिला होता तो त्यांनी पाळला नाही अशी नाराजी व्यक्त केली.

कॉरिडॉर मध्ये सहाशेहून अधिक कुटुंबांना विस्थापित व्हावे लागणार आहे. घरे आणि व्यापारी दुकाने बाधित होणार असल्याने अनेकांनी संतापाची भावना व्यक्त केली. येत्या 25 जुलै रोजी आषाढी एकादशी साजरी होत आहे. सुमारे तीस लाख वारकरी भाविक या सोहळ्यासाठी उपस्थित राहतील असा प्रशासनाचा अंदाज आहे.

एकादशीच्या पूर्व संध्येला म्हणजे 24 जुलै रोजी सकाळी 8 ते 25 जुलैच्या सकाळी 8 वाजेपर्यंत आपली दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय बाधित व्यापाऱ्यांनी घेतला आहे. 24 तास प्रासादिक व अन्य दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेत असताना, आषाढी एकादशीच्या महापुजेसाठी श्री विठ्ठल मंदिरात येणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे स्वागत काळे झेंडे दाखवून करणार असल्याचे बाबाराव महाजन बडवे यांनी स्पष्ट केले.

## 51 कर्मचारी-अधिकाऱ्यांवर मोठी कारवाई! प्रशासकीय वर्तुळात खळबळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांच्या ऑनलाईन तक्रारी आणि अर्जाचे निवारण वेळेत न करता ते प्रलंबित ठेवणे सोलापूर महानगरपालिकेच्या ५१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चांगलेच महागात पडले आहे.

महापालिका उपायुक्त सोनाली यादव यांनी कर्तव्यलवचिकतेचा दाखला देत या सर्वांवर थेट दंडात्मक कारवाईचे आदेश जारी केले आहेत. या धडक कारवाईमुळे महापालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

**'माय सोलापूर' ॲपवरील हलगर्जीपणा**

महापालिकेच्या 'माय सोलापूर' या मोबाईल ॲपवर नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारी वेळेत न सोडवल्याबद्दल २१ कर्मचाऱ्यांना एकूण ४ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.



**महापालिकेचा कडक इशारा**

नागरिकांच्या ऑनलाईन तक्रारी आणि अर्ज विहित मुदतीतच निकाली निघाले पाहिजेत. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, अशा कडक सूचना महापालिका प्रशासनाकडून सर्व संबंधित विभागांना आणि अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे आतातरी महापालिकेचा कारभार गतिमान होणार का आणि नागरिकांच्या तक्रारी वेळेत सुटणार का, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

**लोकसेवा हक्क अधिनियमाचे उल्लंघन**

नागरिकांनी लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत केलेले अर्ज वेळेत निकाली न काढता ते प्रलंबित ठेवल्याप्रकरणी २३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तब्बल २५ हजार ९०० रुपयांचा सामूहिक दंड करण्यात आला आहे.

**कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही**

महापालिका प्रशासनाने डिजिटल प्रणालीचा वापर करून नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर सुटाव्यात यासाठी ऑनलाईन सुविधा सुरू केल्या आहेत. मात्र, तरीही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून कामात दिरंगाई होत असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर उपायुक्त सोनाली यादव यांनी ही कडक भूमिका घेतली आहे.

## संपादकीय

# फास सुटणार तरी कधी?

शेतकरी जिवंत असताना त्याच्या पिकासाठी पैसा नाही, वेळेवर कर्ज नाही, मालाला हमीभाव नाही, विम्याची रक्कम वेळेत नाही; मात्र आत्महत्येनंतर मदतीची घोषणा केली जाते. हा आपल्या कृषी व्यवस्थेतील सर्वात वेदनादायी आणि क्रूर विरोधाभास आहे. शेतकऱ्याला मृत्यूनंतरच्या मदतीची नव्हे, तर सन्मानाने जगण्याची हमी देणाऱ्या धोरणांची गरज आहे.

उत्पादन खर्चावर आधारित लाभदायी भाव, बाजारातील स्वातंत्र्य, वेळेवर कर्ज, प्रभावी पीकविमा, शाश्वत सिंचन, नियमित वीजपुरवठा आणि कृषी निविष्ठांच्या किमतींवर नियंत्रण ही शेतकऱ्याची दया मागणारी नव्हे, तर न्याय्य हक्काची मागणी आहे. मात्र निवडणुकांमध्ये 'अन्नदाता' म्हणून गौरवला जाणारा शेतकरी, निवडणुका संपल्यानंतर पुन्हा कर्जदार, अर्जदार आणि सरकारी आकडेवारीतील एक 'लाभार्थी' बनतो.

साहेबराव करपे यांच्या आत्महत्येला चाळीस वर्षे झाली. त्या घटनेनंतर अनेक सरकारे आली-गेली, समित्या नेमल्या गेल्या, अहवाल तयार झाले, पॅकेजेस जाहीर झाली; पण शेतकरी आत्महत्यांचा फास मात्र सुटला नाही. कारण व्यवस्थेने समस्येच्या मुळावर उपाय करण्याऐवजी मृत्यूनंतर मदतीची व्यवस्था उभारण्यातच समाधान मानले.

आज शेतकरी आत्महत्या हा केवळ कृषी विभागाचा विषय राहिलेला नाही. तो सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेच्या अपयशाचा आरसा आहे. सहा महिन्यांत ४६५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची वस्तुस्थिती ही केवळ आकडेवारी नसून प्रत्येक आकड्यामागे उद्ध्वस्त झालेले एक कुटुंब आहे. प्रत्येक विधवेचा अश्रू आणि प्रत्येक पोरक्या मुलाचा प्रश्न हा विकासाच्या दाव्यांवर उभा राहिलेला कठोर सवाल आहे.

सरकार कोणत्याही पक्षाचे असो, घोषणा कितीही मोठ्या असोत; शेतकऱ्याला उत्पादनाचा योग्य मोबदला, कर्जातून मुक्ती आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळत नसेल, तर ती व्यवस्था शेतकरीहिताची म्हणता येणार नाही. शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर पंचनामा करण्यापेक्षा त्याच्या मनात आत्महत्येचा विचार येऊच नये, अशी व्यवस्था उभी करणे हीच खरी जबाबदारी आहे.

१९८६ ते २०२६ अशी चार दशके उलटली, पण शेतकऱ्याच्या गळ्याभोवतीचा फास अजूनही कायम आहे. आता प्रश्न केवळ मदतीचा नाही, तर व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा आहे. शेतकरी जिवंत राहील, शेती टिकेल आणि त्याला न्याय मिळेल, अशी धोरणात्मक बदलांची वेळ आता निघून चालली आहे.

शेवटी प्रश्न एकच—शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर मदत देणारी व्यवस्था बदलून, त्याला जिवंत ठेवणारी व्यवस्था आपण कधी उभी करणार?

# नीट पेपर फुटल्यावर परिक्षा परत घेतल्या जाते; मग फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका परत का नाही?

भारत लोकशाहीचा देश म्हणून जगप्रसिद्ध आहे. परंतू देशात अलीकडच्या काळात अजब-गजब कहानी घोडेबाजाराच्या माध्यमातून राजकीय वर्तुळात पहायला मिळत आहे. नुकतीच देशात नीट पेपर फुटीचे प्रकार देशभर गाजले.या पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली.या दरम्यान पेपर फुटल्यानंतर सरकारने (शिक्षण विभागाने) दिड-दोन महिन्यात पुन्हा नीटची परीक्षा जाहीर केली व परीक्षा पार पडली.परंतु हाच फामुर्ला फुटलेल्या आमदार-खासदारांना (राजकीय वतुर्ळात) लागू का होत नाही?असे अनेक प्रश्न आज देशाच्या १४५ करोड जनतेच्या मनात भेडसावत आहे.देशातील प्रत्येक व्यक्तीला कल्पना आहे की, राजकीय पुढारी सत्तेसाठी कुठल्याही स्तरावर जायला तयार असतो.यात सर्वसामान्यांना काहीही देणेघेणे नसते आणि नाही.परंतु देशातील प्रत्येक राज्यात सत्तेसाठी, ईडीच्या कारवाई पासून वाचण्यासाठी किंवा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती लपविण्यासाठी पक्ष फुटी, आमदार- खासदार फुटी मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि हा सर्व प्रकार देशाची १४५ कोटी जनता आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत असुन त्यांच्या भावना दुखावत आहे.देशात वेगवेगळ्या विचारांशी संबंधित वेगवेगळे पक्ष आहेत.यात त्यांची नितीमत्ता, आचार-विचार, पक्षाची बांधिलकी आणि देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रती आपुलकी अशा विविध विचारांनी प्रत्येक पक्ष बांधील असतो.परंतू अलिकडच्या काळात ज्या भाजपाला किंवा भाजपविरोधी पक्षांना एकमेकांचे विचार कधीच पटले नाही ते पक्ष आज फक्त सत्तेसाठी एकमेकांचा पक्ष व आमदार- खासदार फोडतांना दिसतात. आमदार-खासदार फोडल्यानंतर ते सत्ताधाऱ्यांना चालतात,त्यांचे आचार-विचार सुध्दा चालते; कारण या मागचा एकच उद्देश असतो तो म्हणजे सत्तेचा लोभ किंवा विरोधक संपविणे. देशाच्या १४५ कोटी जनतेला कल्पना आहे आमदार-खासदार सत्तेसाठी फुटतात. परंतु हेच आमदार-खासदार देशाप्रती व देशाच्या जनतेप्रती घेतलेल्या शपथेचा विचार न करता सत्तेच्या लोभापोटी पक्ष बदलवितांना दिसतात ही बाब जगजाहीर आहे.परंतु पक्षांतर्गत कायद्यानुसार आमदार-खासदारांनी पक्ष सोडला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्या-त्या विधानसभा-लोकसभेच्या क्षेत्रात पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात परंतु तसे होतांना अजिबात दिसत नाही ही कसली लोकशाही म्हणावी! सरकार नीट पेपर फुटी नंतर दिड ते दोन महिन्यांत परिक्षा घेऊ शकतात तर प्रश्न निर्माण होतो की, फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका याच आधारावर ताबडतोब का घेतल्या जात नाहीत.यावरून स्पष्ट होते की सरकार सत्तेसाठी कोणत्याही स्तरावर जायला तयार आहेत. आमदार हा राज्याचे नेतृत्व करतो तर प्रत्येक खासदार हा देशाचे नेतृत्व करीत असतो आणि प्रत्येक आमदार-खासदार हा स्वतःच्या बळावर निवडून येत नसतो त्यांच्यामागे पक्षाचे पाठबळ ६० टक्के, जनतेचे पाडबळ ३० टक्के व स्वतःचे अस्तित्व १० टक्के अशा पध्दतीने प्रत्येक आमदार-खासदार निवडून येत असतो.परंतु पक्ष सोडतांना आमदार-खासदार या सर्वांना विसरतात व स्वतःला त्या क्षेत्राचा मालक(सर्वेसर्वा) समजतात.कारण त्याला सत्तेचा लोभ असतो.यावरून स्पष्ट होते की, निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी जनतेला व पक्षाला विसरतात. त्यामुळे आमदार-खासदार सत्तेसाठी उंदरासारख्या उड्या मारतांना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांना माझा सल्ला व विनंती आहे की, लोकप्रतिनिधी असतांना आपण पक्ष हमखास सोडावा यात माझा किंवा देशाच्या १४५ कोटी जनतेचा तिळमात्र विरोध नाही.परंतु पक्ष सोडतांना आमदारकी किंवा खासदारकीचा प्रथम राजीनामा द्यावा. कारण जनतेनी लोकप्रतिनिधी निवडून देतांना आपला विश्वास व्यक्तिवर दर्शविला नसतो तर पक्षावर व त्यांच्या माणुसकीवर दर्शविला असतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या स्वाथार्साठी जनतेचा विश्वासघात करू नये. त्यामुळे सर्वप्रथम पक्ष सोडायच्या अगोदर आमदार-खासदारकीचा (लोकप्रतिनिधीचा) राजीनामा दिला पाहिजे. तेव्हाच लोकशाही जिवंत राहिल. सरकारने नीट परीक्षेबाबत देशाच्या २२ लाख ७९ हजार ७४३ विद्यार्थ्यांचा विचार केला आणि नीट पेपर फुटल्यानंतर पुन्हा परीक्षा घेतली याचे मनःपासुन स्वागत.परंतु आमदार जेव्हा फुटतो तेव्हा १४ कोटी लोकांच्या भावना दुखावतात आणि जेव्हा खासदार फुटतो तेव्हा देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावना दुखावतात.त्यामुळे सरकारने याबाबतचा गांभीयार्ने संग्यान घेऊन हा खेळ खंडोबा थांबविला पाहिजे व फुटलेल्या आमदारांनी राजीनामे राज्यपालांना द्यावे व खासदारांनी राष्ट्रपतींकडे आपले राजीनामे सुपूर्द करावे व या रिक्त पदांच्या जागांवर ताबडतोब निवडणूक घेण्यात याव्यात. अन्यथा फुटलेल्या आमदार-खासदारांना सरकारने सत्तेत घेतले तर लोकशाही धोक्यात येऊ शकते.मी या लेखाद्वारे महामहीम राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग यांना विनंती करतो की, ज्या प्रमाणे नीट पेपर फुटल्यानंतर काही दिवसातच पुन्हा पेपर घेण्यात आले. त्याच आधारावर फुटलेल्या आमदार- खासदारांच्या मुसक्या आवळण्यासाठी त्यांचे राजीनामे घेवून त्या-त्या विधानसभा-लोकसभा क्षेत्राच्या निवडणुका ताबडतोब घेण्याचे प्रावधान सरकारने ताबडतोब करावे.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

पान १ वरून

## मंत्रालयापासून शाळा-कॉलेजपर्यंत...

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ प्रशासनाला निर्देश दिले आणि सामान्य प्रशासन विभागाने आज अधिकृत सुधारित परिपत्रक जारी करून त्यावर शिक्कामोर्तब केले.

**मंत्रालयापासून शाळा-महाविद्यालयांपर्यंत 'अभिवादन'**

भाषण आदेशानुसार आता अजित पवार यांची जयंती २२ जुलै २०२६ रोजी राज्यभरात अधिकृतपणे साजरी केली जाणार आहे. मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, महाविद्यालये आणि शाळांमध्ये अजितदादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना शासकीय मानवंदना दिली जाईल.

विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय यंत्रणांमध्ये या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. उप सचिव हेमंत महाजन यांच्या स्वाक्षरीने हा आदेश जारी करण्यात आला आहे.

# सोलापूर-मुंबई विमानसेवा 2 ऑगस्टपासून पुन्हा सुरू

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विमानतळावरून 28 जून पासून बंद असलेली सोलापूर ते मुंबई विमानसेवा स्टार एअरलाईन कंपनीकडून 2 ऑगस्ट 2026 पासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेनंतर कंपनीने हा निर्णय घेतला आहे.

28 जून 2026 पासून स्टार एअरलाईनची सोलापूर-मुंबई विमानसेवा तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आली होती. या मार्गावरील विमानसेवा बंद झाल्याने व्यापारी, उद्योजक, रुग्ण तसेच नोकरदार वगार्ची मोठी गैरसोय होत होती. सोलापूरकरांनी ही सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्टार एअरलाइन कंपनीच्या



अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सोलापूर ते मुंबई विमानसेवा तात्काळ सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही कंपनीला विमानसेवा सुरू करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. गोरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडेही याबाबत पाठपुरावा केला होता.

या प्रयत्नांना यश आले असून स्टार एअरलाईन कंपनीने 2 ऑगस्ट पासून सोलापूर-मुंबई मार्गावर विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीने त्यांचे ऑनलाइन बुकिंग काउंटर सुरू करून 2 ऑगस्ट पासूनच्या सोलापूर ते मुंबई प्रवासासाठी बुकिंग घेण्यास सुरुवात केली आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, 'सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी हवाई जोडणी अत्यंत महत्त्वाची आहे. विमानसेवा बंद झाल्याने नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. आता ही सेवा पुन्हा सुरू होत असल्याने व्यापारी, उद्योजक, वैद्यकीय उपचारासाठी जाणारे रुग्ण आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी सोलापूरकरांच्या अडचणीची दखल घेऊन विमानसेवा पुन्हा सुरू करण्यासाठी तत्परतेने पावले उचलली. त्यांच्या या पाठबळामुळे सोलापूरझमुंबई विमानसेवा पुन्हा सुरू होत असून, सोलापूरचा पालकमंत्री म्हणून मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. दरम्यान, सोलापूर-मुंबई विमानसेवेचे वेळापत्रक आणि तिकीट दर स्टार एअरलाईनच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेले आहेत.

**आगमन व प्रस्थान-**

सोमवार आणि बुधवार - आगमन सायंकाळी 17:10(5.10) वाजता आणि प्रस्थान सायंकाळी 17:40(5.40) वाजता.

शुक्रवार आणि रविवार - आगमन दुपारी 13:30(1.30) वाजता आणि प्रस्थान दुपारी 14:00(2.00) वाजता.

विमान आगमन व प्रस्थान कालावधी हा दिनांक 2 ऑगस्ट ते 15 ऑक्टोबर 2026 पर्यंत राहणार असून त्यानंतर वेळेत पुन्हा बदल होणार आहे, अशी माहिती विमानतळ प्राधिकरण यांच्याकडून देण्यात आली आहे.

# अकलूजच्या विकासासाठी 539 कोटीचा निधी मंजूर - उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज मधील वेगवेगळ्या भागातील विकास कामांसाठी शासनाकडून एकूण 539 कोटीचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती, अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी त्यांनी अंडरग्राऊंड गटर (निधी- 121 कोटी) यामध्ये 130 कि. मी. मंजूर काम, त्यापैकी 70 कि. मी काम पूर्ण, मेन चेंबर 5,000 त्यापैकी 3,300 पूर्ण, साईड चेंबर 7,000 त्यापैकी 3,600 पूर्ण, 4.50 लाख टछ्ऊ मलजल शुध्दीकरण केंद्र काम मंजूर असून ते काम अकलाईदेवी मंदीर जवळ सुरू करण्यात येणार आहे. 12 लाख टछ्ऊ मंजूर करण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

तर रस्ते (निधी 120 कोटी) यामध्ये 18 कि.मी. रस्ते आणि 36 कि. मी. गटर मंजूर, त्यापैकी 5 कि. मी रस्त्याचे काम चालू आहे व 10 कि. मी. गटरीचे काम चालू आहे.

**तर पाणीपुरवठा (निधी- 212 कोटी)**

एकूण पाणीपुरवठा लाईन 150 कि. मी. त्यापैकी 90 कि.मी. काम पूर्ण, 77 मैल ते विझोरी तळे 9 कि. मी. ही स्वतंत्र पाईप लाईन, त्यामुळे आपण 12 महिने पाणी तळ्यात आणू शकतो. तसेच तेथे एक जाकवेल व सोलार सिस्टीम देखील आहे. जुना Balancing Tank क्षमता 230 MLD होती, नविन क्षमता 680 MLD होणार.

पूर्ण Balancing Tank RCC होणार. तसेच नविन 5 पाणीपुरवठा टाकी शिवकिर्तीनगर, पंचवटी, विद्यानगर, गुळवेनगर, राऊतनगर, शिवकिर्तीनगर व पंचवटी काम पूर्ण, विद्यानगर व राऊतनगर काम सुरू आहे.गुळवेनगर येथील काम सुरू होणार आहे. जुने Filter House 6 MLD U 8 MLD Capacity चे होते, नविन Filter House 12 MLD Capacity चे करण्यात आले आहेत. सर्व विभागात समान व प्रेशर ने पाणीपुरवठा होण्यासाठी विझोरी तळे येथे 8.50 लाख लिटर Master Balancing नविन पाणी टाकी तयार करण्यात आली आहे.

पुढे बोलताना शिवतेसिंह मोहिते पाटील म्हणाले, माळेवाडी येथील शिवाजीनगर पटेल कॉलनी शांतीनगर येथे सुमारे आठशे कुटुंब राहतात, त्यांना ग्रामपंचायत स्थापनेपासून (1985) बोरवेलचे पाणी होते, यांना आठ ते दहा दिवसात वॉटर सप्लायचे पाणी मिळणार आहे.तसेच पुढील काही दिवसात सर्व माळेवाडी येथील उर्वरित भागात वॉटर सप्लायचे पाणी देण्यात येणार आहे. त्याचेही काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तर सार्वजनिक बांधकाम विभाग (सीआरएफ) निधी 17 कोटी, यामध्ये बायपास रोड जयसिंह चौक ते महर्षी चौक ते प्रतापसिंह चौक, अंडर ग्राउंड स्टॉम वॉटर 4 कि.मी., अंडर ग्राउंड युटिलिटी 4 कि. मी., दोन्ही बाजूंना दोन मीटरने वायडिंग, दोन्ही बाजूंना 2.5 मीटरने फूटपाथ लाईट, बसण्यासाठी बाकडे, डिव्हायडर व त्यामधील झाडे, चौक सुशोभीकरण निधी 2.50 कोटी, महर्षी चौक जयसिंह चौक आणि प्रतापसिंह चौक महर्षी चौक येथे डेकोरेटिव्ह फोन उभारण्यासाठी निधी 70 लाख, पालखी निधी 80 लाख, मुरमासाठी 45 लाख खड्डे बुजवणे 10 लाख लाईट साठी 15 लाख आरोग्य 10 लाख, विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे नमो उद्यान अंतर्गत निधी 1 कोटी, यामध्ये लोकांसाठी बसण्याची व्यवस्था, walking Track ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय, लहान मुलांसाठी खेळणी, योगा हॉल ओपन जिम, झाडे लोन डेकोरेटिव्ह लाईट, अशी कामे करण्यात येणार असून, अंडरग्राउंड गटर निधी 121 कोटी, रस्ते निधी 120 कोटी, पाणीपुरवठा निधी 212 कोटी जिल्हा नियोजन निधी 64 कोटी सीआरएफ बायपास रस्ता सुशोभीकरण निधी 17 कोटी, चौक सुशोभीकरण 2.50 कोटी,

नमो उद्यान निधी 1 कोटी, पालखी अनुदान 80 लाख, डेकोरेटिव पोल 70 लाख असा एकूण निधी 539 कोटी मंजूर झाला असल्याचे अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेसिंह मोहिते पाटील म्हणाले.

# ठाकरे सेना-राष्ट्रवादीत दिलजमाई; कुर्डुवाडी पालिका सभेत १९ विषयांना मंजुरी




**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** सत्ताधारी ठाकरे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात चार दिवसांपूर्वी झालेल्या दिलजमाईनंतर मंगळवारी झालेली कुर्डुवाडी नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नगराध्यक्षा जयश्री भिसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत एकूण १९ विषयांना मंजुरी देण्यात आली.

सभेच्या प्रारंभी नगरसेविका भाग्यश्री पाटील यांनी आरोग्य, भटके कुत्रे, शहरातील पाणीपुरवठा आदी विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करत आपल्या प्रभागातील अडचणी सभागृहासमोर मांडल्या. बुधवारी वीजपुरवठा खंडित असतो, त्यामुळे त्या दिवशी पाणीपुरवठा करू नये, अशी सूचनाही त्यांनी केली.

नगरसेविका वृषाली गांधी यांनी नगरपरिषदेच्या निधीचा उपयोग जनहिताच्या कामांसाठी व्हावा, यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी अधिक गांभीयार्ने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले.

आरोग्य सभापती डॉ. मोहसीन मकणू यांनी आषाढी वारीदरम्यान शहरात येणाऱ्या पालख्या आणि हजारो वारकऱ्यांच्या सुविधांकडे लक्ष वेधले. इतर नगरपालिकांप्रमाणे कुर्डुवाडीलाही वारीसाठी विशेष निधी मिळावा, यासाठी पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच विविध कामांसाठी वारंवार जेसीबी भाड्याने घेण्याऐवजी नगरपालिकेने स्वतःचा जेसीबी खरेदी करावा, अशी मागणी पाणीपुरवठा सभापती अमरकुमार माने यांनी केली.

नगरसेविका अंजली गावडे यांनी गतवर्षी पावसामुळे घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झालेल्या नागरिकांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. जगन्नाथ क्षीरसागर यांनी आपल्या प्रभागातील विविध समस्या मांडल्या, तर सरस्वती क्षीरसागर यांनी शहरात नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. उजनी धरणात सुमारे ५० टक्के पाणीसाठा असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. यावर नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

**मुख्याधिकारी महिन्यातून एकदाच येतात!**

नगरसेविका भाग्यश्री पाटील यांनी मुख्याधिकारी सचिन तपसे हे महिन्यातून केवळ एकदाच नगरपालिकेत येत असल्याने शहराच्या विकासकामांवर परिणाम होत असल्याचा आरोप केला. त्यावर मुख्याधिकारी तपसे यांनी आठवड्यातून किमान दोन वेळा उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

सभेच्या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते समीर मुलाणी, उपनगराध्यक्षा सविता जगताप, शकील तांबोळी, ऋषिपाल वाल्मीकी यांच्यासह अनेक सदस्यांनी सहभाग घेतला.

# हुंडाबळी व छळ खटल्यातून गुजरातच्या शेट कुटुंबाची निर्दोष मुक्तता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. ६ यांच्या न्यायालयाने हुंडाबळी, शारीरिक व मानसिक छळ तसेच दमदाटीच्या आरोपांप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या खटल्यात गुजरातमधील शेट कुटुंबातील पाच जणांची निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायालयाने १३ जुलै २०२६ रोजी हा निकाल दिला.

या प्रकरणात सत्यम महेंद्रकुमार शेट (पती), महेंद्रकुमार अमृतलाल शेट (सासरे), ज्योतीबेन महेंद्रकुमार शेट (सासू), हिरेन महेंद्रकुमार शेट (दीर) आणि मोनलबेन हिरेश शेट (जाऊ) यांच्याविरोधात सोलापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.




फिर्यादी सोनाली सत्यकुमार शेट यांनी सासरच्या मंडळींकडून हुंड्याची मागणी, मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप केला होता. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. श्रीनिवास कटकूर यांनी बाजू मांडली.

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने अभियोजनाकडे आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व विश्वासार्ह पुरावा नसल्याचा युक्तिवाद केला. फिर्यादीने न्यायालयात तक्रारीवरील स्वाक्षरी मान्य केली असली, तरी तक्रारीतील मजकुराची माहिती नसल्याचे सांगितल्याकडेही बचाव पक्षाने न्यायालयाचे लक्ष वेधले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार केल्यानंतर न्यायालयाने अभियोजन पक्ष आरोपींविरुद्धचा गुन्हा वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे नमूद केले. त्यानुसार फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम २७१(१) अन्वये सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

निकालानंतर बचाव पक्षाचे विधिज्ञ ॲड. श्रीनिवास कटकूर यांनी सांगितले की, न्यायालयाने पुराव्यांच्या आधारे दिलेला हा निर्णय सत्य आणि न्यायाच्या विजयाचे प्रतीक असून, खोट्या आरोपांमुळे त्रास सहन करणाऱ्या निर्दोष व्यक्तींना या निकालामुळे न्याय मिळाला आहे.

# पोक्सो प्रकरणी तरुणास उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन - ॲड. जयदीप माने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** फोटो सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर वेळोवेळी शारीरिक संबंध केल्याच्या आरोपावरुन गुन्हा दाखल झालेल्या तरुणाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्कीट बेंचने अटकपुर्व जामीन अर्ज मंजुर केला.

सदर प्रकरणातील अल्पवयीन पीडित मुलीचा विवाह तिच्या आई-वडिलांनी लावून दिला होता. पीडितेचा नवरा कामावर गेल्यानंतर आरोपी हा तिच्या घरासमोर घुटमळत असताना पीडितेने त्याला एकेदिवशी घरी चहासाठी बोलावलेले असताना अचानक आरोपीने तिच्यावर तिचे इच्छेविरुध्द शरीर संबंध केला, त्यानंतर ते फोटो सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देऊन पुन्हा तिच्याबरोबर तिच्या इच्छेविरुध्द शरीर संबंध केला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते.आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज पंढरपूर सत्र न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर आरोपीने उच्च न्यायालय सर्कीट बेंच कोल्हापूर येथे ॲड. जयदीप माने यांच्या



मार्फत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अजार्ची सुनावणी कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मेहरोज पठाण यांच्यासमोर झाली.

आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पीडिता ही आरोपीवर एकतर्फी प्रेम करत होती व तिने लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली होती. ती रोज आरोपीला ३० ते ४० वेळा फोन करत होती व आरोपीला व्हॉटसअप मेसेज पाठवत होती. सदरची बाब तिच्या पतीस व सासूस लक्षात आल्यानंतर त्यांनी तिला तिच्या आई वडिलांकडे पाठवून दिले. आई वडीलांच्या दबावामुळे सदरची फिर्याद दाखल झाली आहे. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तींनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. एस. एन. देशमुख यांनी तर मुळ फिर्यादीतर्फे ॲड. ट्विंकल कोठवडेकर यांनी काम पाहिले.

## वात्रटिका

### लोकशाही बळकट होतेय

बधिर झालेल्या मतीला कळले
लोकशाही बळकट होतेय...
बळकटीच्या दिशेने रोजच
कोणाचे तरी पाऊल पडतेय...
सत्तेत सहभाग आणि पाठिंबा
सर्वांचाच असला पाहिजे...
विरोधी बाकावर कोणीही
बसायला उरला नाही पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर विमानतळ परिसरातील अतिक्रमण हटवा; अन्यथा आंदोलनाचा इशारा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या होटगी रोड विमानतळ परिसरातील नवी जिंदगी भागात वाढलेल्या अवैध अतिक्रमणांमुळे विमानतळ सुरू होण्याच्या प्रक्रियेला आणि सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत सकल हिंदू समाजाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, विमानतळाच्या धावपट्टी (Runway) आणि सुरक्षा क्षेत्रालगत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे वाढली आहेत. या अतिक्रमणांमुळे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (DGCA) नियमांचे उल्लंघन होत असून भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

सकल हिंदू समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, सोलापूरकरांची अनेक वर्षांची मागणी असलेले विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू व्हावे, अशी सर्वांची अपेक्षा आहे. मात्र विमानतळाच्या फनेल झोनमध्ये आणि धावपट्टीच्या परिसरात झालेल्या अतिक्रमणांमुळे आवश्यक मंजुरी मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, विमानतळाच्या राखीव जागेवर झालेल्या अतिक्रमणांमुळे केवळ शासकीय जमिनीचे नुकसान होत नाही, तर भविष्यातील विमानतळ विस्तार आणि नाईट लँडिंगसारख्या सुविधांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या हद्दीतील सर्व अवैध अतिक्रमणे तातडीने हटवून विमानतळ विकासाचा मार्ग मोकळा करावा.

सोलापूरच्या औद्योगिक, व्यापारी आणि सामाजिक प्रगतीसाठी विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू होणे आवश्यक असल्याचे सांगत प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर सकल हिंदू समाजासह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. विमानतळ परिसरातील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आल्याने प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षण समितीच्या बैठकीत गणवेश अनुदानवाढ, शाळांच्या गुणवत्तेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय, भरारी पथकाची घोषणा



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** देशपातळीवर उल्लेखनीय कामगिरी करून महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषद शाळा म्हणून गौरव मिळविलेल्या सांगोला तालुक्यातील शेळकेवाडी (शिवणे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जिल्हा परिषद सोलापूरच्या शिक्षण व आरोग्य समितीची मासिक बैठक पार पडली. भाजप जिल्हाध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक सक्षम सुविधा देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

बैठकीत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. प्राथमिक, माध्यमिक आणि योजना विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके, गणवेश, मुलींसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच जिल्ह्यातील शाळांच्या दुरुस्ती व बांधकामांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. बैठकीतील सर्वाधिक महत्त्वाचा निर्णय म्हणजे शालेय गणवेशासाठीचे अनुदान ₹३०० वरून ₹५०० करण्याचा ठराव. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या उपस्थिती भत्त्यात ₹१ वरून ₹५ प्रतिदिन वाढ करण्यास समितीने मंजुरी दिली. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि 'माझी शाळा' उपक्रमाचाही आढावा घेण्यात आला. रलशफ उपक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करून राज्याचा मान उंचावणाऱ्या शेळकेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी दिंडी, टाळ-मृदुंग आणि हरिनामाच्या गजरात केलेल्या स्वागताने बैठकीला संस्कार आणि परंपरेची अनोखी जोड मिळाली.

'शेळकेवाडीचा आदर्श आता संपूर्ण जिल्ह्यासाठी' या भूमिकेतून समितीने शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड न करण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रत्येक शाळेच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवण्यासाठी विशेष भरारी पथक स्थापन करण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व शिक्षकांचा गौरव आणि आवश्यक ठिकाणी कठोर सुधारणा उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती ' चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

बैठकीस सांगोला पंचायत समिती सभापती पुनमताई इंगवले, उपसभापती अजय सरगर, शिक्षण समिती सदस्य सौ. दिपाली ताड, चंद्रकांत जाधव, सौ. वंदना कांबळे, सौ. श्रुती भोरगुंडे, माजी सभापती शिवाजी कांबळे, शिक्षणाधिकारी कादर शेख, शिक्षण विभागातील अधिकारी, जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, कर्मचारी तसेच शेळकेवाडी शाळेचे शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

> देशपातळीवर उल्लेखनीय यश संपादन करून महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषद शाळा म्हणून नावलौकिक मिळवलेल्या शेळकेवाडी (शिवणे) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा आदर्श आता संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी विशेष भरारी पथक स्थापन करून जिल्ह्यातील सर्व शाळा आणि शिक्षकांच्या कामकाजाचे नियमित निरीक्षण करण्यात येणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व शिक्षकांचा गौरव केला जाईल, तर ज्या ठिकाणी सुधारणा आवश्यक आहे तेथे तातडीने आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील. प्रत्येक विद्यार्थी सक्षम, प्रत्येक शाळा आदर्श आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच जिल्हा परिषदेची प्राथमिकता असल्याचे शिक्षण समितीच्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.
>
> **- चेतनसिंह केदार-सावंत,** भाजप जिल्हाध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती

# तलाव विकासासाठी नव्या ५ कोटींचा प्रस्ताव

## जुन्या कामांवर विरोधकांचा सवाल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विजापूर रस्त्यावरील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तलावाच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा नवीन प्रस्ताव महापालिकेच्या २० जुलै रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला असून, यापूर्वी या तलावावर खर्च झालेल्या सुमारे १० कोटी रुपयांच्या कामांचा हिशेब आणि परिणाम यावर सभागृहात जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेत मार्च महिन्यात मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावाचा सविस्तर अहवाल माहितीस्तव ठेवण्यात येणार आहे. पूर्वीच्या कामांचे ठोस परिणाम दिसत नसताना पुन्हा नव्या कामांसाठी निधी खर्च करण्याच्या प्रस्तावाकडे नागरिकांसह लोकप्रतिनिधींचे लक्ष लागले आहे.

केंद्र शासनाच्या नॅशनल प्लॅन फॉर कन्झर्वेशन ऑफ ॲक्वाटिक इको सिस्टिम योजनेअंतर्गत धर्मवीर संभाजी महाराज तलाव संवर्धन व सुशोभीकरणाचा प्रकल्प मंजूर करण्यात आला होता. एन्व्हिक्लीन असोसिएट्स, कोल्हापूर यांनी या प्रकल्पाचा आराखडा तयार केला होता. १२ सप्टेंबर २०१८ रोजी केंद्राच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने १२.२१ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी दिली होती. त्यामध्ये केंद्र शासनाचा ६० टक्के, तर महापालिकेचा ४० टक्के निधी होता.

प्रकल्पातील १ एमएलडी एसटीपी आणि फ्लोटिंग रॅफ्टरची कामे नंतर रद्द करण्यात आली. मात्र तलावातील गाळ काढणे, जलपर्णी हटविणे, पाण्याची गुणवत्ता तपासणी, कारंजे उभारणे आणि परिसरातील स्थापत्य विकास अशी १०.०४ कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ९.०६ कोटी रुपये खर्च करून सप्टेंबर २०२३ मध्ये कामे पूर्ण झाल्याची नोंद आहे.

मात्र एवढा मोठा निधी खर्च होऊनही तलाव परिसरात त्या कामांचे अपेक्षित परिणाम किंवा अस्तित्व स्पष्टपणे दिसून येत नसल्याची टीका सातत्याने होत आहे. त्यामुळे जुन्या कामांचा आढावा न घेता पुन्हा त्याच परिसरासाठी नव्या सुशोभीकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आल्याने सभागृहात या विषयावर खडाजंगी होण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, स्वदेश दर्शन स्कीम २.० आणि डेस्टिनेशन टुरिझम डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत प्रस्तावित प्रकल्पांपैकी टप्पा क्रमांक १ साठी ४ कोटी ९९ लाख ९६ हजार ६३२ रुपयांचा प्रस्ताव आता २०२६-२७ मधील १०० टक्के शासकीय अनुदानित नावीन्यपूर्ण योजनेतून मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याची परवानगी मागण्यात आली आहे. यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे.

स्मार्ट सिटीसह विविध शासकीय योजनांमधून कोट्यवधी रुपयांचा खर्च झालेल्या विकासकामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असतानाच पुन्हा त्याच ठिकाणी नव्या निधीची मागणी होत असल्याने नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे सभागृह जुना खर्चाचा हिशेब मागणार की नव्या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याची संकल्पना

धर्मवीर संभाजी महाराज तलाव माझ्या प्रभागात येतो. या तलावाचा सर्वांगीण विकास व्हावा, ही आमची भूमिका आहे. पूर्वी मोठा निधी खर्च झाला हे खरे असले तरी ती कामे प्रशासकीय काळात झाली आहेत. त्या कामांवर सभागृहात चर्चा होईल. मात्र आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडलेली संकल्पना राबविली तर हा तलाव सोलापूरमधील महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकतो.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा दिमाखात संपन्न




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या रत्नाई चषक राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत पाचशे पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होऊन स्पर्धेचा समारोप झाला.

श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जयंती निमित्त स्मृतीभवनच्या महर्षी हॉल येथे आयोजित केलेल्या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव,सर्व संचालक, राष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू अनन्या बाळापुरे, सरिस्का बावळे, सई बावळे, सार्थक राऊत, श्रीराम राऊत, ओम राऊत, विनय रणसुंबे, आर्यन माने देशमुख, विनीत रणसुंबे, आदिनाथ हवाले हे प्रमुख उपस्थितीत होते.

आपल्या प्रमूख भाषणात कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांनी सहकार महर्षी काकासाहेबांना त्यांच्या सामाजिक कार्यामध्ये मोठे पाठबळ व योगदान दिले. ही स्पर्धा आक्कासाहेबांच्या पवित्र स्मृतीस अर्पण करीत आहोत. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रताप क्रीडा मंडळाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली आहे. या संधीचे खेळाडूंनी सोने करावे. मागील २५ वर्षापासून या स्पर्धा सुरू आहे. मागील चार वर्षात अधिक खेळाडूंचा सहभाग स्पर्धेमध्ये होता. संख्येबरोबरच गुणवत्ता पूर्वक स्पर्धा हे मंडळाचे ध्येय आहे.

स्पर्धा प्रमुख अभिजीत बावळे यांनी प्रस्तावित केले. या स्पर्धेत ३० कॅश प्राईज, ६० ट्रॉफीज, ६० मेडल तसेच प्रत्येक गटात २० पेक्षा अधिक बक्षिसे देण्यात आली.

प्रथम क्रमांकास रु.१००१ रु, द्वितीय ८०१ रु, तृतीय ७०१ रु, चौथा ६०१ रु, पाचवा ५०१ रु, सहा ते दहा क्रमांकास सन्मानचिन्हे व अकरा ते वीस क्रमांकास मेडल अशी बक्षिसे देण्यात आली.

**स्पर्धेतील गटनिहाय प्रथम पाच क्रमांक पुढील प्रमाणे :**

**(१० वर्ष खुला गट)**

कृष्णराज पताळे, अजिंक्य कांबळे, जय राठी, हर्षवर्धन अरकल, शिवरत्न गोरे

**(१० वर्ष माळशिरस तालुका गट)**

स्मित काटकर, प्रणव भोसले, अभय जगताप, विक्रम भोसले,आरुष माने.

**(१५ वर्ष खुला गट)**

युवराज गायकवाड, विहान कोंगारी, राजवर्धन काळे, प्रणव मजगे, आयुष उपाडे,

**(१५ वर्ष माळशिरस तालुका)**

सार्थक राऊत, विनय रणसुंबे, अनन्या बाळापुरे, श्रीराम राऊत, सानवी वाघमोडे.

**(खुला तालुकाबाह्य गट)**

देवदत्त पटवर्धन, प्रसन्न जगदाळे, शौर्य साळुंखे, आदिराज म्हेत्रे, अभिराज पवार.

**(खुला माळशिरस तालुका गट)**

अनिरुद्ध गुरव, प्रतीक इंगळे, समाधान सूर्यवंशी, अनिल सोनवणे, ओम राऊत.

स्पर्धेचे पंच म्हणून उदय वगरे, विजय पंगुडवाले, प्रज्वल गोरे, नितीन अग्रवाल, अमर शिंदे, अनिता बाळापुरे, कर्णाक्षी जाधव, राहुल बोराटे, शिवशंकर पांढरे, मिलिंद माने देशमुख, प्रियंका पाटील यांनी काम पाहिले. निकाल वाचन किरण सूर्यवंशी व राजकुमार पाटील यांनी केले.

# चपळगांव गटातील गावांसाठी हन्नुरमध्ये लोकप्रतिनिधी-अधिकाऱ्यांची सहविचार सभा



> हन्नुर येथे आयोजित लोकप्रतिनिधी-अधिकारी-कर्मचारी यांच्या सहविचार सभेमुळे चपळगांव गटातील विवीध प्रश्नांविषयी सखोल चर्चा पार पडली.यामुळे भविष्यातील उपाययोजनांसाठी हातभार लागणार आहे.तर या उपक्रमामुळे प्रशासन-लोकप्रतिनिधी एकाच ठिकाणी एकत्रित आले.यामुळे वेळेचीदेखील बचत झाली. याच पध्दतीने तालुक्यात सगळीकडे सहविचार सभा घेणार आहोत.
>
> **- सागर कल्याणशेट्टी**
> (उपसभापती-पंचायत समिती, अक्कलकोट)

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** आपल्या जिल्हा परिषद गटातील व गणांतील गावे स्मार्ट बनावीत.प्रत्येक खेडेगांवातील सद्यस्थिती आणि तिथे शासनाच्या योजना कितपत राबविल्या आहेत.यापुढे काय करायचे आदी प्रश्नांसाठी जिल्हा परिषदेच्या सदस्य शांभवी कल्याणशेट्टी, पंचायत समितीचे सभापती रश्मी हिप्परगी व उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांच्या संकल्पनेतून चपळगाव गटातील गावांसाठी हन्नूर येथे लोकप्रतिनिधी व अधिकारी यांची संयुक्तिक बैठक पार पडली. यामध्ये १८ गावांमधील प्रशासक सरपंच-उपसरपंच, जि.प.शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र-उपकेंद्र, आशा वर्कर्स व संबधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर जि.प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, सभापती रश्मी हिप्परगी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, पंचायत समिती सदस्य विनोद मोरे, गटविकास अधिकारी शंकर कवितके, सहाय्यक गटविकास अधिकारी अमोल मुंडे,उप अभियंता एम.एस. उंबरजे, बाल विकास अधिकारी भोसले पाणीपुरवठा उप अभियंता व्ही.डी राठोड, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, विनायक तवटे, डी.जी कवडे, आरोग्य अधिकारी अश्विन करजखेडे, वित्त विभागाचे एस होणसुरे, उमेदचे केशवदास, स्वच्छ भारत मिशनचे सतीश शिंगे, प्रियंका संगमनेरकर, कार्यक्रमाधिकारी पूनम मुळे, प्रशासक सरपंच सोनाली तळवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी शांभवी कल्याणशेट्टी यांनी या सहविचार सभेचा हेतु स्पष्ट केला. यावेळी चपळगांव, हन्नुर, बऱ्हाणपुर, बावकरवाडी, चपळगांववाडी, डोंबरजवळगे, कुरनुर, सिंदखेड, मोट्याळ, किणी, काझीकणबस, किणीवाडी, सुलतानपुर, बोरेगांव, दर्शनाळ, पितापुर, नन्हेगांव, अरळी, चुंगी आदी गावातील लोकप्रतिनिधी-अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यासमयी प्रत्येकांनी आपापल्या अडी-अडचणी,सुचना मांडल्या.

# आषाढी वारी २०२६ : पंढरपूरमध्ये दूध, दुग्धजन्य पदार्थ व अन्नात भेसळ करण्यास प्रतिबंध

## उल्लंघन केल्यास कारवाई

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा सोहळ्याच्या कालावधीत वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पंढरपूर शहर व परिसरातील दूध, दुग्धजन्य पदार्थ, बेकरी पदार्थ तसेच हॉटेलमधील अन्न पदार्थांमध्ये भेसळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) अन्वये हा प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. चालू वर्षी आषाढी यात्रा सोहळ्याचा कालावधी दि. १५/०७/२०२६ ते २९/०७/२०२६ असा आहे. या काळात लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी व चंद्रभागा स्नानासाठी पंढरपूरला येतात. आषाढी एकादशी ते गोपाळकाल्यापर्यंत वारकरी पंढरपूर शहरात वास्तव्यास असतात. त्यांच्या भोजनात प्रामुख्याने दूध, दुग्धजन्य पदार्थ, बासुंदी, खीर व खिचडीचा समावेश असतो.

**Classified - छोटी जाहीरात**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन लोकांचा धर्मग्रंथ २) घर (हिंदीत) ३) नदीचा काठ, बाण ४) बसपाच्या अध्यक्षा ५) एक कंदमूळ ६) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा ९) आर्थिक कुवत १०) हिंदी सिनेसृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेता १२) छ. शिवरायांच्या एक पत्नी १३) सल उलट लिहा १४) पम उलट लिहा १६) एक इंग्रजी मुळाक्षर १७) द्रोणाचार्यांना अंगठा कापून देणारा धनुर्धारी शिष्य १८) शिवकालीन लढाई पध्दत-गनिमा ** २०) लायब्ररी (मराठीत) २१) मादीच्या विरूध्दार्थी शब्द २३) स्वार्थ, हव्यास २६) दहशतयुक्त वजन, दरारा २७) निवृत्त भारतीय फलंदाज- राहुल *** २९) जादू, किमया ३१) खिडकीच्या वा दरवाजाच्या फटीतून आत येणारा किंचीतसा प्रकाश ३२) कुत्र्याचा जोडीदार ३४) वस्तूचे बाह्यस्वरूप, साईज (मराठीत) ३५) मांत्रिकाने दिलेला गळ्यात बांधतात तो ३८) कवितेतील जुळून येणारी रचना, शब्दालंकार ३९) आंबा (हिंदीत) ४०) वन, अरण्य (हिंदीत) ४१) युध्दापूर्वीची सामोपचाराची बोलणी

**आडवे शब्द :** १) सुप्रिया सुळे या लोकसभा मतदारसंघाच्या खासदार आहेत ४) धैर्यशील मोहिते-पाटील खासदार असलेला लोकसभा मतदारंघ, सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका ५) धनंजय मुंडे या जिल्ह्यातील आहेत ७) तूप (हिंदीत) ८) छोटे चारचाकी प्रवासी वाहन ९) लगेच, त्वरेने ११) शरीर (हिंदीत) १२) सूट, मोकळीक १४) विषमच्या विरूध्दार्थी शब्द १६) तीस आणि एक मिळून होणारी संख्या १७) समरस, मग्न, दोन भिन्न वस्तूंचे पूर्णपणे एक होणे १८) गोंधळ, धरणाच्या पाण्याचा मोठा कॅनॉल १९) एक म्हण-** नको पण कुत्रं आवर २०) उणीव, टंचाई २२) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्रयंत्र २४) एक म्हण-*** तोंडी मोठा घास २५) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला छोटा पाट २६) मनावरील दडपण २७) धन, पैसाआडका २८) संशय (हिंदीत) ३०) महाराष्ट्राची राजधानी ३१) कविता रचणारा ३२) आधार (हिंदीत) ३३) लहान बाळाला टोचतात ती ३४) एखाद्या गोष्टीचा छंद, ही असेल तर सवड मिळते ३५) कब्जा, ** घेणे ३६) कडधान्याचे वाळलेले काटक्या ३७) शालेय मुलांचा घेतला जाणारा व्यायाम प्रकार ३९) माता, जननी ४०) पाऊस (हिंदीत) ४२) एक विदेशी मद्य ४३) निवडणुकीत उमेदवाराला मत देण्याची क्रिया ४४) गजराज, सोंड असलेला मोठा प्राणी ४५) बशीचा साथीदार

## सुडोकु - 04

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 5 | 3 | | | 9 | 6 | |
| 7 | 6 | 3 | 4 | | | 1 | | |
| | | 8 | | | 1 | | | |
| 1 | | | | | | 4 | | |
| | 9 | 6 | | 4 | | | 1 | 8 |
| 2 | | 4 | 1 | | 6 | 7 | 5 | |
| 6 | 7 | 2 | | 8 | | | 3 | |
| 8 | 3 | | 2 | 5 | | | | |
| 5 | | 9 | | | | 8 | 2 | |

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांची पेटेंट संदर्भात दमदार कामगिरी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी तंत्रज्ञानावर आधारित तीन अभिनव संशोधन प्रकल्प विकसित करून त्यांचे पेटेंट प्रकाशित करण्यात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी केवळ संशोधन प्रकल्पच विकसित केले नाहीत तर पेटंटचा शोध (प्रायर आर्ट सर्च), पेटंट मसुदा लेखन, दावे तयार करणे, अर्ज दाखल करणे आणि पेटंट प्रकाशित होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया स्वतः पूर्ण केली आहे. विद्यार्थ्यांची ही कामगिरी स्वेरीमधील संशोधन संस्कृती आणि ऑटोनॉमस अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेचे एक उत्तम उदाहरण ठरत आहे, हे मात्र निश्चित !



स्वेरीच्या नावातच 'रिसर्च' हा शब्द असल्याने सुरुवातीपासून शिक्षणासोबतच संशोधनाची संस्कृती स्वेरीमध्ये रुजली आहे. आजतागायत स्वेरीकडून एकूण ७९ पेटेंटस फाइल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ७६ पेटेंटस पब्लिश झालेली असून ०३ पेटेंटस प्रोसेस मध्ये आहेत आणि एकूण ०५ पेटेंटस ग्रँट झालेली आहेत.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी विकसित करण्यात आलेला ह्यऑन ऑटोनॉमस वेअरेबल पर्सनल सेफ्टी सिस्टम युटीलायझिंग मल्टी मॉडेल सेन्सर फ्युजन अँड रिअल टाईम कम्युनिकेशनह्ल हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित परिधान करता येणारा सुरक्षा प्रकल्प स्वेरीमध्ये शिक्षण घेत असलेल्या पायल शिंदे, गौरी साळुंखे, श्रद्धा भोंग आणि आर्य परकाळे यांनी विकसित केला आहे. स्मार्ट बँड, स्मार्ट घड्याळ किंवा लॉकेटच्या स्वरूपात वापरता येणारी ही प्रणाली जीपीएस, त्वरणमापक, जायरोस्कोप आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या साहाय्याने धोकादायक परिस्थिती ओळखते. आपत्कालीन प्रसंगी ही प्रणाली आपोआप मदतीचा संदेश आणि थेट स्थानाची माहिती कुटुंबीय तसेच पोलीस नियंत्रण कक्षाला पाठवते. ऊर्जा संवर्धनाला चालना देणारा 'थर्मो इलेक्ट्रीक जनरेटर बेस्ड सेल्फ पॉवर्ड किचेन एक्झाष्ट सिस्टम युजिंग गॅस स्टोव्ह, वेस्ट हिट रिकव्हरी' हा प्रकल्प ऋतुराज कोरे आणि ऋतुजा कोरे यांनी विकसित केला आहे. यामध्ये गॅस स्टोव्हमधून वाया जाणाऱ्या उष्णतेपासून विद्युत ऊर्जा निर्माण करून त्याच ऊर्जेवर स्वयंपाकघरातील धूरनियंत्रक यंत्रणा चालविण्याची अभिनव संकल्पना या प्रकल्पातून साकारण्यात आली आहे तसेच 'क्लिअर फ्लो स्मार्ट मोनीटोरिंग इंडस्ट्रीजयल वेस्ट रीसक्युर्लेशन सिस्टम' हा औद्योगिक सांडपाण्याचे स्मार्ट निरीक्षण व पुनर्वापर करणारा पर्यावरणपूरक प्रकल्प श्वेता कोरे, साक्षी पाटील आणि प्रतीक्षा सावंत यांनी विकसित केला आहे. ही प्रणाली सांडपाण्याची गुणवत्ता सतत तपासून त्याचा पुनर्वापर करण्यास मदत करते.

स्वेरीच्या ऑटोनॉमस अभ्यासक्रमात बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर), उत्पादन विकास, नवोपक्रम, उद्योजकता आणि संशोधन पद्धती यांसारख्या उद्योगाभिमुख विषयांचा समावेश असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची दृष्टी विकसित होत आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी स्वतः पेटंटचा मसुदा तयार करणे, दावे लिहिणे, अर्ज दाखल करणे आणि पेटंट प्रकाशित होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडत आहेत, ही बाब स्वेरीच्या सक्षम संशोधन संस्कृतीची साक्ष देणारी असून राज्यातील अभियांत्रिकी शिक्षणात महाविद्यालयाची वेगळी ओळख निर्माण करत आहे. महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधनपूरक वातावरण आणि प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सामाजिक व औद्योगिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्याची संधी मिळत आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पेटंट, संशोधन, स्टार्टअप, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील उत्तम संधी उपलब्ध होत असून ते शिक्षणासोबतच संशोधक अभियंते म्हणून पुढे येत आहेत. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन या विभागाच्या प्रमुख डॉ. निता तळवळकर आणि प्रा.आशुतोष गरड यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या समाजोपयोगी, पर्यावरणपूरक आणि तंत्रज्ञानाधारित संशोधन कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, स्वेरी संशोधन, नवोपक्रम आणि पेटंट निर्मितीच्या क्षेत्रात नवी उंची गाठत असल्याचे या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे, हे मात्र निश्चित!

# गुरुदेव दत्त भाग-1 मधील रस्त्यावरील दिव्यांची समस्या अखेर दूर

## माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २६ मधील गुरुदेव दत्त भाग-१ परिसरातील अनेक दिवसांपासून बंद असलेल्या रस्त्यावरील दिव्यांची समस्या अखेर दूर झाली आहे. माजी नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर महानगरपालिकेने तातडीने दुरुस्ती करून परिसरातील प्रकाश व्यवस्था पूर्ववत केली.



गुरुदेव दत्त मंदिर परिसरात भाविकांची नेहमीच वर्दळ असते. मात्र, रस्त्यावरील दिवे बंद असल्यामुळे नागरिकांसह भाविकांना रात्रीच्या वेळी मोठा त्रास सहन करावा लागत होता. स्थानिक नागरिक व मंदिराच्या पुजाऱ्यांनी झोन कार्यालय तसेच महापालिकेच्या लाईट विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही समस्या कायम होती. ही बाब नागरिकांनी माजी नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे तसेच लाईट विभागाचे प्रमुख परदेशी यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह देखभाल पथक घटनास्थळी दाखल होऊन बंद दिव्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात आली.

यावेळी स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांचे प्रश्न राजश्री चव्हाण यांच्या कार्यकाळात मार्गी लागले. परिसरात पाणीपुरवठा पाइपलाइन, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत काँक्रीट रस्ते आणि आता रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था अशा विविध विकासकामांमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नागरिकांच्या समस्यांवर तत्परतेने प्रतिसाद देत जनसेवा करणाऱ्या लोकप्रतिनिधींची प्रत्येक प्रभागाला गरज असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कोरे, माळी, वीरेंद्र पुजारी, वाहतूक पोलीस हवालदार पाटील, मयूर पुजारी, बनसोडे, रेल्वे अधिकारी वलेकर, रेणुका पुजारी तसेच सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# समान नागरी कायदा समितीत मुस्लिम प्रतिनिधींना स्थान द्या - ॲड.एम.एच.शेख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने राज्यात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. तसेच आगामी हिवाळी अधिवेशनात यासंदर्भातील कायदा करण्याचे संकेतही मुख्यमंत्री यांनी दिले आहेत.

सर्व जाती-धर्मांतील महिलांना समान न्याय, समान हक्क आणि सामाजिक न्याय मिळावा, ही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्पष्ट भूमिका आहे. विवाह, घटस्फोट, वारसा, दत्तक, पोटगी अशा नागरी बाबींमध्ये महिलांना समान हक्क आणि न्याय मिळण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा झाल्याच पाहिजेत. समान नागरी कायद्याच्या कोणत्याही चर्चेच्या केंद्रस्थानी सर्व जाती-धर्मांतील महिलांचे हक्क, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय आणि भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्ष मूल्ये असली पाहिजेत.



मात्र, राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीची रचना पाहता तिच्या सर्वसमावेशकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात. समान नागरी कायद्याबाबत देशभरात सर्वाधिक चर्चा ज्या मुस्लिम समाजाच्या वैयक्तिक कायद्यांच्या संदर्भात होत असते, त्या मुस्लिम समाजातील कायदेतज्ज्ञ, महिला प्रतिनिधी किंवा सामाजिक तज्ज्ञ यांना समितीत स्थान देण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे ख्रिस्ती, पारशी तसेच इतर संबंधित अल्पसंख्याक समाजांचेही प्रतिनिधित्व समितीत दिसून येत नाही. याशिवाय, सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या अधिकारांच्या दृष्टीने काम करणाऱ्या महिला प्रतिनिधींनाही समितीत स्थान देण्यात आलेले नाही.

अशा महत्त्वाच्या विषयावर तयार होणारा कायदा व्यापक सामाजिक स्वीकारार्हता मिळवायचा असेल, तर त्याच्या मसुदा प्रक्रियेत सर्व संबंधित समाजघटकांचा सहभाग आवश्यक आहे. विशेषतः मुस्लिम समाजातील जाणकार कायदेतज्ज्ञ, महिला प्रतिनिधी आणि सामाजिक तज्ज्ञ, तसेच सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या महिला प्रतिनिधींचा समितीत समावेश करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कायद्यात महिलांच्या सामाजिक न्याय, समान हक्क आणि घटनात्मक संरक्षणासंबंधी अधिक प्रभावी तरतुदी करता येतील.

लोकशाही व्यवस्थेत अशा स्वरूपाचा व्यापक परिणाम करणारा कायदा लोकसहभाग, संवाद आणि सर्वसमावेशकतेच्या आधारेच तयार झाला पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने समितीची पुनर्रचना करून त्यामध्ये मुस्लिम समाजासह सर्व संबंधित समाजघटक आणि सर्व जाती-धर्मांतील महिलांच्या हक्कांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला प्रतिनिधींचा समावेश करावा, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे असे मत राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ.ॲड.एम.एच.शेख यांनी व्यक्त केले.

# सोलापूरकरांची लाडकी 'हुतात्मा एक्सप्रेस'चे रौप्यमहोत्सवी वर्षात पर्दापण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारी आणि प्रवाशांच्या गळ्यातील ताईत बनलेली 'हुतात्मा एक्सप्रेस' आज आपल्या सेवेची यशस्वी २५ वर्षे पूर्ण करून रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. या खास आणि ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून सोलापूरच्या रेल्वेप्रेमींनी एकत्र येत एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता.

या दिमाखदार सोहळ्यासाठी हुतात्मा एक्सप्रेसच्या इंजिनला अत्यंत आकर्षक आणि सुंदर फुलांनी सजवण्यात आले होते. तसेच या गाडीचे अधिकृत बोधचिन्ह देखील विशेष रितीने सजवून त्याला नवा लूक देण्यात आला.

**अन्नदात्या आणि कर्तव्यदक्षांचा सन्मान: इंजिन चालकांच्या हस्ते केक कापला!**

नेहमी पडद्यामागे राहून हजारो प्रवाशांचा प्रवास सुखकर करणाऱ्या फ्रंटलाईन रेल्वे कर्मचाऱ्यांचा सन्मान करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यासाठी गाडी मार्गस्थ होण्यापूर्वी ऑन-ड्यूटी लोको पायलट (Loco Pilot) आणि असिस्टंट लोको पायलट (Assistant Loco Pilot) यांच्या



हस्ते केक कापून हा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे आणि योगदानाचे कौतुक करण्याचा हा अनोखा प्रयत्न उपस्थितांचे मन जिंकून गेला.

**रेल्वेप्रेमींचे मोलाचे योगदान**

हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी सोलापूरमधील निष्ठावंत रेल्वेप्रेमी अश्विन गोरे, पुष्कर खामीतकर, शुभंकर कुलकर्णी, नील दणके, राज म्हामणे, अनीश जाधव, अथर्व श्रीमाळ आणि प्रसन्न बाबर या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या सर्व सदस्यांच्या उपस्थितीमुळे आणि अथक प्रयत्नांमुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. सोलापूर विभागातील या अत्यंत महत्त्वाच्या आणि अभिमानाच्या रेल्वेला सन्मानित करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिला, त्या सर्वांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# उषा साठे हत्येच्या निषेधार्थ योद्धा प्रतिष्ठानच्या वतीने अकलूज बंद



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उषा साठे हत्येच्या निषेधार्थ, बहुजन समाजाच्या वतीने, अन्याविरुद्ध एल्गार पुकारला होता. तर योद्धा प्रतिष्ठानच्या वतीने बंद पुकारण्यात आला होता. बंदला अकलूजकरांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला तर मोर्चामध्ये बहुजन समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. माळशिरस तालुक्यातील चौंडेश्वरवाडी येथे 6 जुलै रोजी उषा साठे या महिलेची सचिन देशमुख या आरोपीने गोळी झाडून हत्या केली होती.याच्या निषेधार्थ योद्धा प्रतिष्ठानने बंद पुकारला होता, या बंदला उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला तर बहुजन समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढण्यात आला होता.सदर मोर्चा मध्ये मोठ्या संख्येने बहुजन बांधव, वेगवेगळ्या संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दलित चळवळीचे ज्येष्ठ नेते विकास धाईंजे, योद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शेखर खिलारे, प्रा.अरुण खंडागळे, मल्हारी करडे माजी उपसरपंच गारवड, नगरसेवक महेश शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे माळशिरस तालुका अध्यक्ष अभिजीत गायकवाड, केशव लोखंडे, कुमार लोंढे, शैलेश पोटफोडे आदींनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या.

> वेपन जप्त केली असून, आरोपीला अटक केली आहे. सॅम्पल ही मुंबई पुणे सोलापूर या ठिकाणी पाठवण्यात आले आहे. ज्याच्या नावावर वेपन आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही फॅमिलीला पोलीस संरक्षण देण्यात आले आहे. कायदेशीर बाबीचा अभ्यास करून कारवाई केले जाईल तर जलद गतीने पाठपुरावा चालू आहे.
>
> **संतोष वाळके,** उपविभागीय पोलीस अधिकारी

# सोलापूर महापालिकेत मोठी खांदेपालट

## अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या प्रशासनात मोठी खांदेपालट करण्यात आली असून प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, परिणामकारक आणि समन्वयपूर्ण करण्याच्या उद्देशाने अभियंते, तांत्रिक कर्मचारी, अनुरेखक, भूमापक, आरोग्य निरीक्षक तसेच मानधनावरील कनिष्ठ अभियंत्यांच्या मोठ्या प्रमाणावर अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या बदल्यांमुळे नगर अभियंता, नगर रचना, घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय तसेच विविध विभागीय कार्यालयांतील कामकाजात अधिक समन्वय साधून विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा आयुक्तांनी व्यक्त केली आहे.



बदली झालेल्यांमध्ये उपअभियंता अविनाश वाघमारे यांची नगर रचना विभागात, तर सहायक अभियंता प्रकाश दिवाणजी यांची झोन कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच म. हनीफ बक्षी, राघवेंद्र गायधनकर, श्याम कन्ना, इर्शाद हुसेन जरतार, सुनीता हिवारे, प्रमोद गोविंदवार, दयानंद आवताडे आणि गणेश काकडे यांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय अभिजित बिराजदार यांची घनकचरा व्यवस्थापन विभागातून नगर अभियंता कार्यालयात, आदिनाथ कांबळे यांची सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयातून नगर रचना विभागात, राहुल अडलिंगे यांची नगर अभियंता कार्यालयातून विभागीय कार्यालय क्रमांक १ मध्ये, तर लैला नदाफ यांची नगर अभियंता कार्यालयातून नगर रचना विभागात बदली करण्यात आली आहे.

अनिरुद्ध गदगे, दीपाली मेटकरी, महेंद्र बोटे, विक्रांत लोकापुरे, आशिष घुले, अजिंक्य साळुंके, परशुराम बोंमकंटी, लायेका मनगोळी, इम्तियाज नदाफ, शिवाजी नलावडे, किशोर फत्तेवाले, सूरज ढवळे आणि सौरभ क्षीरसागर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची विविध विभागांत बदली करण्यात आली आहे. भूमापक भारत रोडगे, सुफियान पठाण, सलीम पटेल, राजकुमार कावळे, एस. टी. कोळी आणि आर. बी. शिवसिंगवाले यांनाही नवीन पदस्थापना देण्यात आली आहे.

आरोग्य निरीक्षकांमध्ये नितीन नरळे, सोमनाथ ताकभाते, राहुल गदवालकर, अंजली काकडे आणि प्रकाश नरळे यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तसेच कनिष्ठ अभियंते विश्वजीत कवठे, भाऊसाहेब गेजगे, श्रीशैल उटगी, प्रणोती कदम, पूजा देशमाने, अंबिगार, विवेकानंद स्वामी आणि प्रतीक कोल्हे यांच्याही विभागीय बदल्या करण्यात आल्या आहेत.

मानधनावरील कनिष्ठ अभियंते अंजना कोने, चेतन प्रचंडे, दीपक कुंभार, सलमान मणियार, बसवराज बडगा, सागर खरोसेकर, पूनम कांबळे, अनिकेश मिठ्ठा आणि कल्याणी बिराजदार यांच्या बदल्यांचाही आदेशात समावेश आहे.

महापालिका आयुक्तांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तत्काळ नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होऊन कार्यभार स्वीकारण्याचे निर्देश दिले असून विभागप्रमुखांनी 'चार्ज ट्रान्सफर सर्टिफिकेट' पूर्ण करून रुजू अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा, असे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, पदस्थापनेच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा संघटनात्मक दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ मधील नियम २३ नुसार संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेशात दिला आहे.

# एसआयआर कार्यक्रमाचा केंद्रीय उप निवडणूक आयुक्तांकडून आढावा

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदार यादी त्रुटीमुक्त व अचूक तयार करण्यावर भर देत प्रत्येक टप्प्यावरील काम निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावे, तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कामाचा नियमित आढावा घेऊन प्रगतीचे सातत्याने परीक्षण करावे, अशा सूचना भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त ग्यानेश भारती यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी पुणे विभागातील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी भारत निवडणूक आयोगाचे प्रधान सचिव अजोय कुमार झा, उप सचिव अभिनव अग्रवाल, राज्याचे उप मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सुर्यवंशी, विभागातील जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, विजय राठोड, मैनाक घोष, सहआयुक्त स्वाती देशमुख, संजीव पलांडे,



तुषार ठोंबरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर उपस्थित होते.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम, जिल्हाधिकारी संतोष पाटील व एस. कार्तिकेयन हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होते.

उप निवडणूक आयुक्त भारती यांनी संबंधित अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील प्रत्येक काम सर्वोच्च प्राधान्याने आणि जबाबदारीने पार पाडावे, असे सांगितले.

कामातील त्रुटी तातडीने दूर करून अपेक्षित उद्दिष्टे वेळेत गाठण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा. कार्यक्रमासाठी निश्चित करण्यात आलेली कालमर्यादा काटेकोरपणे पाळावी. मतदार यादी त्रुटीमुक्त करण्यासाठी गणना फॉर्म भरताना प्रत्येक मतदाराची माहिती काळजीपूर्वक पडताळून अचूक नोंद करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी भेटी देऊन प्रत्येक मतदाराची माहिती प्रत्यक्ष पडताळावी, असे सांगितले. मतदार यादीमध्ये कोणतीही चूक किंवा त्रुटी राहणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सर्व कागदपत्रांचे काम नियमानुसार आणि परिपूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याबरोबरच आवश्यक अर्ज, नोंदी, छायाचित्रे आणि इतर संबंधित कागदपत्रांची अचूक पूर्तता करण्यावर त्यांनी भर दिला. मतदारांच्या तक्रारी आणि हरकतींचे त्वरित व प्रभावी निराकरण व्हावे यासाठी पुणे जिल्ह्यात मंडलनिहाय सुनावण्या घेण्याऐवजी संबंधित मतदान केंद्रांवरच सुनावणी घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सादरीकरणाद्वारे पुणे विभागातील विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची माहिती दिली. पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली या पाच जिल्ह्यांमध्ये एकूण २ कोटी १६ लाख १ हजार १९८ मतदार असून २१ हजार २३७ मतदान केंद्रे आहेत. विभागातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून ४७ हजार ७३० मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले आहेत.

गणना अर्जाच्या छपाईचे काम शंभर टक्के पूर्ण झाले असून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील सर्व उद्दिष्टे निश्चित कालावधीत पूर्ण करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीला विभागीय आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच पुणे शहरातील सर्व मतदान नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

# मुख्य कार्यकारी अधिकारी महाडदळकर कसबे तडवळे जि.प.शाळांना भेट

**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद आदर्श केंद्रिय प्राथमिक शाळा कसबे तडवळे या ठिकाणी आज धाराशिव जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी भेट दिली. अर्धवेळ शाळे दिवशी सकाळी साडेआठ वाजता त्यांनी शाळेला भेट दिली.शाळेतील भौतिक सुविधा माहिती घेऊन प्रत्यक्ष वगार्ला त्यांनी भेटी दिल्या. यामध्ये इयत्ता तिसरी, पाचवी, चौथी, पहिली, दुसरी, सहावी या वर्गांना भेटी देऊन प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तिसरीच्या वगार्तील विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील वाचन घेतले.पाचवीच्या वगार्तील विद्यार्थ्यांना प्रथमतः इंग्रजी विषयाबाबत विचारून विद्यार्थ्यांना बोलते केले. तसेच वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला मोठे झाल्यावर तू काय होणार असे प्रश्न विचारून त्यांची उत्तरे ऐकून समाधान व्यक्त केले.गणित विषयाच्या नवोदय



स्पर्धा परीक्षेतील सरावाच्या वह्या प्रत्यक्ष पाहिल्या. इयत्ता चौथीच्या वर्गात भेट देऊन वर्गातील विद्यार्थी स्वतःबद्दल इंग्रजीमध्ये माहिती देणे हा उपक्रम घेतला.योग्य शब्द वाक्याची रचना कशी करायची हे विद्यार्थ्यांना स्वतःहून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी पंधरा दिवसात अक्षरांचे अवयव गिरवून शब्दांचे प्रकट वाचन सुरू केल्याबद्दल अभिनंदन केले.इयत्ता दुसरीच्या वर्गाला फळ्यावरील उतारा वाचायला सांगितला.तीन-चार मुलांना उतारा वाचण्यास सांगून इंग्रजीचे पुस्तकही दुसरीतील मुले वाचतात याबद्दल समाधान व्यक्त केले.पहिली अ वगार्ला भेट देऊन मुळाक्षरांचे वाचन घेतले. इयत्ता दुसरी ब च्या वर्गात मुलांना विविध प्रश्न विचारून सी. ई.ओ.मॅडमनी बालकांचे भविष्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांचा सत्कार मिरॅकल हे पुस्तक देऊन शाळा व्य स अध्यक्ष विजय पवार, सदस्य राहुल नाईकनवरे मुख्याध्यापक केशव पवार यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी पाचवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना मन मे है विश्वास हे पुस्तक भेट देऊन त्यांच्या अभिनंदन केले. तसेच डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.त्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकास भेट देऊन माहिती घेतली.शाळेच्या भौतिक सुविधांचा आढावा घेताना दोन नादुरुस्त खोल्यांच्या निर्लेखनाबाबत शालेय समिती व मुख्याध्यापकांकडून माहिती घेतली.भेटीदरम्यान शाळा समितीचे अध्यक्ष पवार, मुख्याध्यापक केशव पवार, सदस्य राहुल नाईकनवरे, भागवत शिंदे, सुहास सावंत, तेजस भालेराव, पवन करंजकर, नानासाहेब पवार, भारत लोंढे, माजी अध्यक्ष अमोल पवार, कन्या शाळा माजी अध्यक्ष सोमनाथ भोसले, राजेंद्र करंजकर, प्रशांत सदावर्ते, बाळासाहेब करंजकर व शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते.